
















# ५८ वा
## वार्षिक अहवाल

# २०१८-१९


बँकेच्या सातत्यपूर्ण
यशामागे आहे
**आपणा सर्वांचा**
**अढळ विश्वास**

# दि बारामती सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : भिगवण रोड, बारामती, पिन : ४१३१०२

ऑडिट वर्ग 'अ'

# श्री छत्रपती शिवाजी महाराज



सहयाद्रीचा सिंह गर्जतो । शिवशंभू राजा ।
नसांनसातुन नाद गुंजतो । महाराष्ट्र माझा ।।



# प्रेरणास्थान

**पद्मविभूषण मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार**

**अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**



कणखर नेतृत्व व कुशल मार्गदर्शक

**मा. आ. श्री. अजितदादा पवार**

माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



बारामतीचे भूषण

**संसदरत्न**

**मा. खा. सौ. सुप्रियाताई सुळे**

# दि बारामती सहकारी बँक लि.

## संचालक मंडळ

(सन २०१५ ते २०२०)



श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची
अध्यक्ष



श्री. अविनाश रमेश लगड
उपाध्यक्ष



श्री. रमणिक रामजी मोता



श्री. सचिन सदाशिव सातव



ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी



श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के



श्री. दिग्विजय पोपटराव तुपे



श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर



श्री. उध्दव सोपानराव गावडे



श्री. सुरेश गुलाबराव देवकाते



श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे



श्री. कपिल राजेंद्र बोरावके



डॉ. वंदना उमेश पोतेकर



सौ. कल्पना प्रदिप शिंदे



श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे
तज्ञ संचालक (सी.ए.)



ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे
तज्ञ संचालक



श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर
कार्यकारी संचालक



श्री रविंद्र शिवाजीराव बनकर
सरव्यवस्थापक (प्रशासन)



श्री विनोद कांतीलाल रावळ
सरव्यवस्थापक (वित्त)

**दि बारामती सहकारी बँक लि.**

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(फक्त सभासदांसाठी)

## विशेष सूचना

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार **दिनांक ११ ऑगस्ट २०१९ रोजी** सकाळी ०९.४५ वाजता राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, भिगवण रोड, बारामती या ठिकाणी बोलविण्यांत आली आहे. सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज घेण्यांत येईल. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

## * सभेपुढील विषय *

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०९ सप्टेंबर २०१८ रोजीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रके वाचून मंजूर करणे. (पान नं. १२ ते १७)
३. सन २०१८–२०१९ या वर्षासाठी मा. संचालक मंडळाने केलेल्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांष जाहीर करणे. (पान नं. ८)
४. मा. सरकारी लेखापरिक्षक यांनी तपासणी केलेल्या सन २०१८–२०१९ सालच्या आर्थिक हिशोब तपासणी अहवालाची वाचून नोंद घेणे, तसेच सन २०१७–१८ च्या सरकारी लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
५. सन २०१९–२०२० या वर्षासाठी बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा ठरविण्याचे अधिकार संचालक मंडळास देणे.
६. सन २०१९–२० या आर्थिक वर्षासाठी सरकारी लेखापरिक्षक व स्थानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेचा अधिकार संचालक मंडळास देणे.
७. बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांच्याकडे चालू आर्थिक वर्षात असलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८. सन २०१९–२०२० या आगामी आर्थिक वर्षाचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे व मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या उत्पन्न व खर्चास मंजूरी देणे. (पान नं. २१ व १८)
९. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०. बँकेच्या शाखांकरिता जागा खरेदी करण्यासाठी इमारत निधीचा विनियोग करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
११. मा. अध्यक्षांचे परवानगीने ऐनवेळी उपस्थित विषयांचा विचार करणे.

**दिनांक : २५ जुलै २०१९**

**स्थळ : बारामती**

**मा. संचालक मंडळाच्या अनुज्ञेनुसार**

**श्री. गो. बहुळकर**
**कार्यकारी संचालक**

## * विशेष सूचना *

१. ही सभा कोरम अभावी तहकूब करावी लागल्यास सभा अर्धा तास तहकूब केली जाईल व त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर तहकूब झालेली सभा घेतली जाईल. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.
२. सभासदांना वर नमूद विषया संबंधी काही विचारावयाचे असल्यास तसे त्यांनी दि. ०९ ऑगस्ट २०१९ अखेर पर्यंत बँकेत लेखी कळवावे. त्यांनतर आलेल्या पत्रांच्या विषयाचे अथवा शंकांचे निरसन करण्याचे बंधन बँकेवर असणार नाही.
३. सभासदांना देण्यात येणाऱ्या लाभांषाची रक्कम बँक सभासदांच्या बँकेतील सेव्हिंग्ज्/चालु किंवा अन्य खात्यात जमा देत असते. ज्या सभासदांचे खाते बँकेत नसेल त्यांनी त्वरित खाते उघडून या सेवेचा लाभ घ्यावा.
४. ९७ व्या घटनादुरूस्तीनंतर सभासदांची वर्गवारी क्रियाशिल सभासद व निष्क्रीय सभासद अशी करण्यांत आली आहे. यापुढे क्रियाशिल सभासदांनाच संचालक मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचा, मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. क्रियाशिल सभासदांसाठी पुढील अटी आहेत.
   १. बँकेच्या पोटनियम क्र. १४ व १५ नुसार सभासदाने कमीतकमी रू. १५००/– चे भाग धारण करणे आवश्यक आहे. तसचे पाच वर्षात एकातरी वार्षिक सभेस उपस्थित रहावयाचे आहे.
   २. सभासदाची बँकेत रूपये सात हजाराची ठेव असावी किंवा त्यांचा रूपये एक लाखाचा कर्जव्यवहार असणे आवश्यक आहे. तरी ज्या सभासदांनी हे निकष पुर्ण केले नाहीत, त्यांना निष्क्रीय सभासद म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे, याची नोंद घ्यावी.

# शाखा विस्तार

| अ.क्र. | शाखेचे नांव | दुरध्वनी क्र. / भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|
| ०१ | मुख्यालय (स्वमालकीची वास्तु) | (०२११२)२२४८६५, २२२८४४/९९२२४४४१५० |
| ०२ | बारामती शाखा | (०२११२)२२४८६६, २२७७०४/९९२२४४४१५१ |
| ०३ | इंदापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१११)२२३२७७, २२४७६६/९९२२४४४१५३ |
| ०४ | भिगवण शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११८)२४६२०५ /९९२२४४४१५४ |
| ०५ | दौंड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११७) २६४४७७,२६४९५९ /९९२२४४४१५५ |
| ०६ | चिंचवड शाखा | (०२०) २७४५०११०, ७३५४८२६/९९२२४४४१५६ |
| ०७ | कोथरूड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २५३९५२०० /९९२२४४४१५७ |
| ०८ | मार्केट यार्ड शाखा | (०२०) २४३६०९६६ /९९२२४४४१५८ |
| ०९ | निरा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११५) २४२४७७ /९९२२४४४१५९ |
| १० | फलटण शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६६) २२२७७७ /९९२२४४४१६१ |
| ११ | करमाळा शाखा | (०२१८२) २२०९७७ /९९२२४४४१६० |
| १२ | बार्शी शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१८४) २२२०८९ /९९२२४४४१६२ |
| १३ | पुणे – नगर रोड शाखा | (०२०) २७०११९४२, २७०११९३७ /९९२२४४४१६३ |
| १४ | लक्ष्मी रोड शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२०) २४४५५५१७ /९९२२४४४१६४ |
| १५ | हडपसर शाखा | (०२०) २६९८१८६६ /८३८०००४२९२ |
| १६ | सातारा शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६२) २३७९४०,२३७९५५ /९९२२४४४१६५ |
| १७ | सोलापूर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१७)२७२९२६६, २७२९२७७/९९२२४४४१६६ |
| १८ | जळोची शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २२४८६५, २२४८४४ /९८५०८९४५४९ |
| १९ | संगमनेर शाखा | (०२४२५) २२७६६६, २२२७०१ /८३८०००४२९४ |
| २० | चाकण शाखा | (०२१३५) २४९११२ /८३८०००४२९५ |
| २१ | शिरूर शाखा | (०२१३८) २२२२६६ /८३८०००४२९७ |
| २२ | अहमदनगर शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२४१) २३२७७०१ /८३८०००४२९६ |
| २३ | नवी सांगवी शाखा | (०२०) २७२०३०८८ /९९२२९११४०४ |
| २४ | भोसरी शाखा | (०२०) २७११००१६ /९९२२४४४२०८ |
| २५ | सिंहगड रोड शाखा | (०२०) २४३५५१५५ /७८८७८८०१५३ |
| २६ | काष्टी शाखा | (०२४८७) २३११७७ /७८८७८८०१५४ |
| २७ | शिरवळ शाखा (स्वमालकीची वास्तु) | (०२१६९) २४५२४४ /७८८७८८०१५९ |
| २८ | तळेगांव शाखा | (०२११४) २२२८४४ /७८८७८८०१५६ |
| २९ | हिंजवडी शाखा | (०२०)२२९३४६४६ ७८८७८८०१५७ |
| ३० | टेंभुर्णी शाखा | (०२१८३) २३१९७७ /७८८७८८०१५८ |
| ३१ | सिन्नर शाखा | (०२५५१) २२२६६६ /७८८७८८०१६० |
| ३२ | श्रीरामपूर शाखा | (०२४२२) २२५५६६ /७८८७८८०१६१ |
| ३३ | मोहोळ शाखा | (०२१८९) २३३८७७ /७८८७८८०१६२ |
| ३४ | पनवेल शाखा | (०२२)२७४५५०४६ |
| ३५ | माळेगांव शाखा | (०२११२)२५४११२ ७८८७८८०१६४ |
| ३६ | कोंढवा शाखा | (०२०) २६९३३१३१ ७८८७८८०१६५ |
| ३७ | वाई शाखा | (०२१६७) २२२७७७ ७८८७८८०१६३ |
| ३८ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष) (स्वमालकीची वास्तु) | (०२११२) २४४२५४ /९०२८७७७२४३ |

## ❋ संचालक मंडळ ❋

**श्री. श्रीकांत मुरलीधर सिकची**
अध्यक्ष

**श्री. अविनाश रमेश लगड**
उपाध्यक्ष

**श्री. श्रीनिवास गोपाळराव बहुळकर**
कार्यकारी संचालक

| | | |
|---|---|---|
| श्री. रमणिक रामजी मोता | श्री. सचिन सदाशिव सातव | ॲड. श्री. शिरीष दत्तात्रय कुलकर्णी |
| श्री. देवेंद्र रामचंद्र शिर्के | श्री. दिग्विजय पोपटराव तुपे | श्री. सुभाष रामचंद्र जांभळकर |
| श्री. उध्दव सोपानराव गावडे | श्री. सुरेश गुलाबराव देवकाते | श्री. विजयराव प्रभाकरराव गालिंदे |
| श्री. कपिल राजेंद्र बोरावके | डॉ. वंदना उमेश पोतेकर | सौ. कल्पना प्रदिप शिंदे |

**श्री. प्रितम सुर्यकांत पहाडे**
तज्ञ संचालक (सी.ए.)

**ॲड. श्री. सतिश शिवलिंग सालपे**
तज्ञ संचालक

**बँकर्स**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

दि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पुणे

स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बारामती

एच.डी.एफ.सी. बँक, पुणे

# दि. ३१ मार्च २०१९ अखेर शाखावार ठेवी, कर्जे व नफा याबाबतची माहिती

(₹ कोटीत)

| अनु. | शाखेचे नांव | ठेवी | कर्ज | नफा / तोटा |
|---|---|---|---|---|
| ०१ | बारामती शाखा | ३०९.३२ | १८०.५८ | १.५६ |
| ०२ | इंदापूर शाखा | १३९.८९ | ७२.६४ | ०.७७ |
| ०३ | भिगवण शाखा | ५४.१३ | २२.३८ | ०.२६ |
| ०४ | दौंड शाखा | ६०.२० | ६०.४६ | ०.५७ |
| ०५ | चिंचवड शाखा | ९५.१६ | ६४.९४ | ०.५८ |
| ०६ | कोथरूड शाखा | ८७.९८ | ३६.५६ | ०.२८ |
| ०७ | मार्केट यार्ड शाखा (धनकवडी) | ७२.८४ | ३६.८८ | ०.५४ |
| ०८ | निरा शाखा | ७४.६९ | २४.९८ | ०.२० |
| ०९ | फलटण शाखा | ३७.१८ | ४९.०८ | ०.५० |
| १० | करमाळा शाखा | ४६.९९ | २७.२३ | ०.२० |
| ११ | बार्शी शाखा | ५३.४० | ५८.२१ | ०.३८ |
| १२ | पुणे - नगर रोड शाखा | ६२.८९ | ९८.४० | ०.७२ |
| १३ | लक्ष्मी रोड शाखा (सदाशिव पेठ) | ३१.५३ | ३०.१७ | ०.४० |
| १४ | हडपसर शाखा | ४५.७३ | ५३.३१ | ०.६१ |
| १५ | सातारा शाखा | ६५.५६ | ५९.८५ | ०.६० |
| १६ | सोलापूर शाखा | २९.३२ | २४.४८ | ०.२९ |
| १७ | जळोची शाखा | १०६.८४ | ११८.६५ | ०.४७ |
| १८ | संगमनेर शाखा | ९४.०० | ११.८४ | ०.१० |
| १९ | चाकण शाखा | ३०.४८ | १९.३१ | ०.०८ |
| २० | अहमदनगर शाखा | ३८.५५ | ४.३८ | ०.०२ |
| २१ | शिरूर शाखा | ४४.१० | २६.१३ | ०.०७ |
| २२ | नवी सांगवी शाखा | २३.८३ | ५.६८ | ०.०५ |
| २३ | भोसरी शाखा | २४.११ | २८.५६ | ०.०९ |
| २४ | सिंहगड रोड शाखा | १०.२९ | ५.२६ | ०.०३ |
| २५ | शिरवळ शाखा | १५.८८ | ११.०६ | ०.०५ |
| २६ | काष्टी शाखा | १७.६३ | १०.०८ | ०.१२ |
| २७ | तळेगांव शाखा | १०.५९ | १३.०४ | ०.०५ |
| २८ | हिंजवडी शाखा | ११.८९ | १४.८० | ०.१६ |
| २९ | टेंभुर्णी शाखा | ९.०२ | ११.७५ | ०.१२ |
| ३० | सिन्नर शाखा | ३६.३२ | ७.६६ | ०.०४ |
| ३१ | श्रीरामपूर शाखा | २६.०१ | १.७५ | ०.०४ |
| ३२ | मोहोळ शाखा | ४.६० | ३.६५ | ०.०१ |
| ३३ | पनवेल शाखा | १०.०८ | ४.९१ | ०.०२ |
| ३४ | माळेगांव बु.।। शाखा | २८.९१ | ९.१३ | ०.०२ |
| ३५ | कोंढवा शाखा | ९.७७ | १.८५ | ०.०१ |
| ३६ | वाई शाखा | १३.८६ | ३.११ | ०.०२ |
| ३७ | टेक्सटाईल पार्क, बारामती (वि.कक्ष.) | ५.७२ | ०.५५ | -०.०१ |
| ३८ | मुख्यालय | ०.०० | ०.०० | १.१० |
| | **एकूण** | **१८३९.२९** | **१२१३.३०** | **११.१२** |



## सन २०१८-१९ चा ५८ वा अहवाल

**श्रीकांत सिकची** (अध्यक्ष)

**सन्माननीय सभासद बंधु-भगिनींनो,**

आपल्या बँकेच्या ५८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्व सभासद बंधु-भगिनींचे मी संचालक मंडळाच्या वतीने स्वागत करतो व आपल्या उपस्थितीबद्दल आभार व्यक्त करतो.

दि. ३१/०३/२०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात सरकारी लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेला अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक आपणापुढे सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. सहकारी बँक प्रामुख्याने सभासद, संचालक, ग्राहक व सेवक या खांबांवर उभी असते. सभासदांना व ग्राहकांना मिळणाऱ्या बँकींग विषयक सुविधांतून त्यांना मिळणारे समाधान, संचालकांचा एकसंघ व पारदर्शी कारभार, सेवकवर्गाची त्यागाची भावना व आपुलकीची सेवा आपल्या बँकेत दिसून येते. हे चारही घटक समाधानी आहेत हेच आपल्या बँकेचे प्रगतीचे खरे कारण आहे.

आपल्या सर्वांचे बँकेवरील नितांत प्रेम व सहकार्य, विश्वास तसेच मा.आ.श्री. अजितदादा पवार माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शनामुळे अहवाल सालात ठेवी, कर्जे, नफा व डिजीटल बँकींग सेवा या सर्व क्षेत्रात बँकेने भरीव प्रगती केलेली आहे. अहवाल सालात बँकेचा सर्वांगिण विकास झालेला आहे. त्याचा थोडक्यात आढावा मी आपणांपुढे सादर करीत आहे.

अहवाल सालाचे सुरूवातीस बँकेच्या ठेवी ₹१५६४.९३ कोटी इतक्या होत्या. अहवाल सालात ठेवींमध्ये ₹२७४.३६ कोटींनी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकुण ठेवी ₹१८३९.२९ कोटी इतक्या झालेल्या आहेत. ठेवींमधील ही वाढ शे. १७.५३ टक्के इतकी आहे. अहवाल सालात कर्जवाटप ₹१०२५.८९ कोटीवरून ₹१२१३.३० कोटी इतके झालेले आहे. ही वाढ शे. १८.२७ टक्के इतकी आहे. कर्ज वाटप करतांना भारतीय रिझर्व बँकेचे नियमास आधीन राहून कर्जवाटप केलेले आहे. अल्पउत्पन्न गट, अग्रक्रम व दुर्बल घटकांसाठी बँकेने कर्जवाटपात प्राधान्य दिले आहे.

बँकेचे वसुल भागभांडवल अहवाल सालात ₹२.६६ कोटींनी वाढ होऊन वर्षअखेरीस भागभांडवल ₹३१.५० कोटी इतके झालेले आहे. त्याचप्रमाणे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण शे. १३.२० टक्के इतके झाले आहे.

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर बँकेचा ढोबळ नफा ₹२२.५२ कोटी इतका झाला आहे. आयकर व इतर कायदेशीर तरतुदी वजा जाता बँकेस निव्वळ नफा ₹११.१२ कोटी इतका झाला आहे. मागील वर्षीपेक्षा अहवाल सालात निव्वळ नफा ₹०.८७ कोटींनी वाढलेला आहे.

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर बँकेचा नेट एन.पी.ए. १.९८ टक्के इतका आहे. अहवाल सालात कमी पर्जन्यवृष्टी, बाजारातील आर्थिक मंदी, शेतमालाचे पडलेले भाव यांमुळे बँकेच्या वसुलीवर परिणाम झाला आहे. सदरचे प्रमाण कमी करण्याचा संचालक मंडळाचा निर्धार आहे. आपण सर्वांनी त्यास सहकार्य करावे ही विनंती.

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर सरकारी लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून बँकेस ऑडीट वर्ग 'अ' मिळालेला आहे. अहवाल सालात सभासदांना त्यांच्या भागावर शे.१२ टक्के इतका लाभांष देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतलेला आहे. आपण त्यास मान्यता दयावी ही विनंती.

अहवाल सालात बँकेच्या एकूण ३६ शाखा कार्यरत असून १ विस्तारित कक्ष आहे. बँकेची ३३ शाखांमध्ये एटीएम मशिन्स आहेत. तसेच बँकेच्या सर्व शाखांत आर.टी.जी.एस., नेफ्ट ची सुविधा आहे. त्याचबरोबर पॅनकार्ड, जीएसटी, विजबिल भरणा, इन्कमटॅक्स इत्यादी सरकारी कर भरण्याची सुविधा, पंतप्रधान विमा योजना तसेच मोबाईल बँकींग व एस.एम.एस. बँकींग सुविधा उपलब्ध आहेत. तसेच चेक क्लिअरींगसाठी आपल्या बँकेस NCC ची डायरेक्ट मेंबरशिप मिळालेली आहे. त्यामुळे ग्राहकांना चेक क्लिअरींगची सुविधा जलद मिळणार आहे.

संचालक मंडळाने परंपरागत बँकींग पध्दतीत अमुलाग्र बदल केलेले आहेत. कर्ज मंजुरीचे अधिकार ठराविक मर्यादेपर्यंत अधिकाऱ्यांना प्रदान केलेले आहेत. त्यामुळे कर्ज वितरण व्यवस्था गतिमान झालेली आहे. सेवकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणांमुळे अभ्यासू वृत्ती व निर्णय क्षमता वाढलेली आहे. आपले बँकेने रिझर्व्ह बँकेचे सर्व निकष तंतोतंत पाळण्याचे सातत्य टिकविलेले आहे. त्यामुळे आपली बँक आर्थिकदृष्टया भक्कम आणि सुयोग्य व्यवस्थापन असलेले FSWM (Financially Sound and Well Managed) या रिझर्व्ह बँकेच्या मानांकनास पात्र ठरली आहे.

आज पुणे जिल्हयातील पहिल्या चार सहकारी बँकांमध्ये आपल्या बँकेची गणना होत आहे ही आपल्या सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. आगामी काळात बँकेच्या ठेवी ₹२००० कोटीपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ठ ठेवण्यात आले असून आपल्या सर्वांच्या सहकार्याने हे उद्दिष्ठ नक्कीच साध्य करू यात शंका नाही.

अहवाल सालात मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवारसो़, मा. आ. श्री. अजितदादा पवारसो़ माजी उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मा. खा. सौ. सुप्रियाताई सुळे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क यांनी व आपण सर्वांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य यामुळेच बँकेचा विकास व प्रगती झाली आहे. तसेच बँकेचे उपाध्यक्ष, सर्व संचालक मंडळ, मुख्यालयातील अधिकारी, शाखांचे शाखाधिकारी, सर्व सेवकवर्ग व सभासद बंधु भगिनी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले याबद्दल मी सर्वांचे मनःपासुन आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या संमतीने आपणास अहवाल सादर करीत असून त्यास आपण मंजुरी प्रदान करावी ही विनंती.

कळावे,

आपला कृपाभिलाषी,
**श्रीकांत सिकची**
(अध्यक्ष)

# ❊ सन २०१८-१९ चा ५८ वा अहवाल ❊

**सभासद**

अहवाल वर्षाच्या सुरूवातीस एकुण सभासद संख्या १६६१५ इतकी होती. अहवाल वर्षात नव्याने १६६४ सभासद झाले आहेत व ३८० सभासद कमी झाले आहेत. अहवाल वर्षअखेर सभासदांची संख्या १७८९९ इतकी आहे.

**भागभांडवल**

मागील वर्षी बँकेचे वसुल भागभांडवल ₹ २८.८४ कोटी इतके होते. अहवाल सालात भाग भांडवलामध्ये ₹ २.६६ कोटींनी वाढ होऊन वर्ष अखेरीस एकुण भागभांडवल ₹ ३१.५० कोटी इतके झालेले आहे.

**भांडवल पर्याप्तता (CRAR)**
(Capital to Risk Weightd Assets Ratio)

भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार किमान ९% असणे आवश्यक आहे. मार्च २०१९ अखेर आपल्या बँकेचे हे प्रमाण १३.२०% इतके आहे व ते आपल्या सुदृढतेचे व आर्थिक स्थैर्याचे द्योतक आहे.

**स्वनिधी**

बँकेच्या आर्थिक सक्षमतेच्या निकषांमध्ये स्वनिधी व महत्वाचा घटक आहे या अहवाल वर्षात बँकेच्या स्विनिधी मध्ये ₹ ११.१४ कोटीने वाढ होऊन अहवाल वर्ष अखेर ₹ ११६.०१ कोटी इतका स्वनिधी झालेला आहे. यावरून आपल्या बँकेची आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे आपल्या लक्षात येईल.

**ठेवी**

अहवाल वर्षात बँकेच्या ठेवींमध्ये ₹ २७४.३६ कोटीने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१९ अखेर एकूण ठेवी ₹ १८३९.२९ कोटी इतक्या झालेल्या आहेत.

**ठेव विमा**

आपली बँक नियमितपणे ठेव विम्याचे हप्ते डिपॉझीट इन्शूरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन यांचेकडे भरत असून ठेवीदारांना रू. एक लाखापर्यंत विमा संरक्षण प्राप्त करून दिले आहे. बँकेने दि. ०१/०४/२०१९ ते ३०/०९/२०१९ या कालावधीसाठी देय असलेला ₹ १.०९ कोटी इतक्या रकमेचा विमा हप्ता दिनांक २८/०५/२०१९ रोजी भरला आहे. या पुढेही हप्ते नियमितपणे भरण्यात येतील.

**कर्जे**

मागील वर्षी आपल्या बँकेची एकूण कर्जे ₹ १०२५.८९ कोटी इतकी होती. अहवाल वर्षात बँकेच्या एकूण कर्जांमध्ये ₹ १८७.४१ कोटी इतकी वाढ होऊन वर्षा अखेर आपल्या बँकेची एकूण कर्जे ₹ १२१३.३० कोटी इतकी झाली आहेत. कर्जवृध्दीचे प्रमाण १८.२७% इतके आहे. मार्च २०१९ अखेर ठेव-कर्जाचे प्रमाण (CD Ratio) हे ६५.९७% इतके झाले आहे. बँक विविध उत्पन्न गटातील कर्जदारांना सर्व प्रकारच्या कर्जांचे वाटप करीत आहे. भारतीय रिझर्व बँकेचे नियमास अधिन राहून बँकेने कर्जवाटप केलेले आहे. तसेच कर्जाची गुणवत्ता राखण्यातही यश मिळविलेले आहे. कर्जवाटपातील वाढीमुळे नफाक्षमता वाढण्यास मदत झालेली आहे.

**गुंतवणूक व निधी व्यवस्थापन**

गतवर्षी बँकेची गुंतवणूक ₹ ५०७.९१ कोटी रूपयांची होती. अहवाल सालात त्यामध्ये ₹ ४१.३७ कोटी रूपयांची वाढ होऊन वर्षअखेर एकुण गुंतवणूक ₹ ५४९.२८ कोटी इतकी झाली आहे.

कर्ज व्यवहाराप्रमाणेच बँकेच्या उत्पन्नात महत्वाचे योगदान गुंतवणूक विभागाचे असते. रिझर्व बँकेचे गुंतवणुक धोरणानुसार गुंतवणुकीचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकेचे यासाठी रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडे SGL खाते असून सर्व व्यवहार रिझर्व बँकेतील चालू खात्यातून केले जातात. त्यासाठी CCIL ची मेंबरशिप बँकेस मिळालेली आहे.

**अस्ति देयता (Asset Liability) व्यवस्थापन समिती (ALCO)**

भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शी सुचनांप्रमाणे बँकेने अस्ति देयतांचे व्यवस्थापन करणेकामी अस्ति देयता व्यवस्थापन (ALCO) समिती स्थापन केलेली आहे

### अग्रक्रम व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा

भारतीय रिझर्व बँकेचे निकषानुसार कर्ज वाटपामध्ये अग्रक्रम क्षेत्रास शे. ४४.२२% इतके कर्जवाटप केलेले आहे. तर त्यापैकी दुर्बल घटकांस शे. २९.३२ टक्के कर्जवाटप केलेले आहे.

### अनुत्पादक कर्ज (एन.पी.ए.)

दिनांक ३१ मार्च २०१८ अखेरीस १.७२% इतके असणारे निव्वळ एन.पी.ए. च्या प्रमाणात ०.२६% इतकी वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१९ रोजी निव्वळ एन.पी.ए. १.९८% इतका राहिला आहे. जीएसटी तसेच व्यवसायातील मंदी यामुळे बरेच व्यापाऱ्यांना अडचणींना तोंड दयावे लागत आहे. तसेच शेतमालाचे भाव पडलेले आहेत. त्यामुळे वसुलीवर परिणाम होत आहे. त्यासाठी थकबाकीदारांनी वेळीच थकबाकी भरावी अन्यथा जाहीर नोटीस, जप्ती व लिलाव यांसारख्या कटु प्रसंगांना सामोरे जावे लागेल. बँकेस खात्री आहे की खातेदार असा प्रसंग येऊ देणार नाहीत व आपली थकबाकी वेळेवर भरतील.

### वैधानिक लेखापरिक्षण

दिनांक ३१ मार्च २०१९ चे वैधानिक लेखापरिक्षण रूचिता बोबाना पार्टनर ब्रमास ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांनी पुर्ण केलेले असून ऑडीट वर्ग 'अ' कायम ठेवला आहे.

### माहिती व तंत्रज्ञान विभाग

माहिती तंत्रज्ञाना शिवाय बँकींग क्षेत्रात प्रगती व स्पर्धा करणे अशक्य बाब आहे. म्हणून बँकेने स्वतःचे आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे डेटा सेंटर व डिझास्टर रिकव्हरी सेंटर उभारले आहे. त्यामधूनच कोअर बँकींग सॉफ्टवेअर व्दारे बँकेचे सर्व कामकाज चालते. यामुळेच आपली बँक ग्राहकांना व खातेदारांना सर्वोत्तम सेवा प्रदान करीत आहे. त्यापैकी काही सेवांची माहीती पुढील प्रमाणे.

### ए.टी.एम. सेवा

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर बँकेच्या एटीएम कार्ड धारकांची संख्या ४०५२६ इतकी आहे. ही सर्व कार्डस ई.एम. व्ही चिप बेस असून त्यामुळे कार्डवरील गोपनीय माहीती सुरक्षित राहते. बँकेने एटीएम व्यवहारांव्दारे ग्राहकांची आर्थिक फसवणुक होऊ नये म्हणून तांत्रिक सुरक्षा तसेच विमा उतरवून खातेदारांच्या हिताची काळजी घेतलेली आहे. सध्या बँकेच्या ३२ शाखांत ३४ एटीएम मशिन आहेत. तसेच देशभरातील एकूण २५०००० पेक्षा जास्त एटीएम सेंटर्सव्दारे ग्राहकांना व्यवहार करता येतात. बारामती, दौंड, सातारा याठिकाणी ए.टी.एम. सहीत कॅश डिपॉझीट मशिन बसविलेली आहेत. बँकेने इन्स्टा कार्ड व ग्रीन पीन सेवा सुरू केलेली आहे. त्यामुळे खातेदारांस एटीएम कार्ड मिळण्यासाठी प्रतिक्षा करावी लागत नाही. खातेदारांनी मागणी करताच बँकेकडून एटीएम कार्ड (इन्स्टा कार्ड) त्वरित दिले जातात. तसेच खातेदारांना व्यवहारासाठी OTP व्दारे पीन दिला जात आहे.

### पॉज मशिन सेवा

बँकेच्या ग्राहकांना एटीएम कार्ड च्या साहयाने कोणत्याही पॉज मशिनव्दारे डिजीटल व्यवहार करता येत आहेत. तसेच व्यापाऱ्यांना आपल्या बँकेने पॉज मशिन उपलब्ध करून दिलेली आहेत. त्याचा लाभ अनेक व्यापारी खातेदार घेत आहेत.

### मोबाईल व एस.एम.एस. बँकींग

बँकेच्या खातेदारांना मोबाईल बँकींग व्दारे कोणतेही पेमेंट देणे आता शक्य झालेले आहे. खातेदार क्षणार्धात घरबसल्या असे डिजीटल पेमेंट करू शकतात. तसेच बँकेत खात्यामध्ये झालेल्या व्यवहारांची माहीती तात्काळ एस.एम.एस. व्दारे मिळू शकत आहे. सध्या ही सुविधा ६१३२७ इतके खातेदार घेत आहेत.

### आर.टी.जी.एस. /नेफ्ट सुविधा

आपल्या बँकेस आर.टी.जी.एस. सेवे करीता रिझर्व बँकेची मेम्बरशिप मिळालेली आहे. त्यामुळे खातेदारांना सर्व शाखांमधून रक्कम पाठविणे किंवा मिळण्याची सोय उपलब्ध झालेली आहे. बँक रिझर्व बँकेची डायरेक्ट मेम्बर असल्यामुळे विनाविलंब व्यवहार होत आहेत.

### CTS Clearing सि.टी.एस. क्लिअरींग

खातेदारांचे संपुर्ण देशभरातील कोणत्याही बँकेवरील चेक्स वसुल करण्यासाठी बँकेस नॅशनल क्लिअरींग सेलची मेम्बरशिप मिळालेली आहे. त्यामुळे खातेदारांचे बाहेरगावचे चेक्स देखिल कमी कालावधीत वसुल करणे अतिशय सुलभ झाले आहे.

**NDS OM (निगोशिएटेड डिलींग सिस्टीम-ऑर्डर मॅचिंग सेगमेंट)**

रिझर्व बँकेव्दारे ऑनलाईन सरकारी रोख्यांची खरेदी विक्री करण्यासाठी CCIL व्दारे चालविण्यांत येणाऱ्या प्रणालीसाठी आपली बँक मेम्बर आहे. त्याव्दारे सुरक्षितरित्या कोणत्याही ब्रोकर शिवाय आपल्या बँकेस हे व्यवहार करता येत आहेत. भविष्यात गुंतवणूक विभागास उत्पन्नाचा चांगला मार्ग उपलब्ध झालेला आहे.

**नॉन बँकींग उत्पन्न**

१) बँकेच्या दैनंदीन व्यवहारातून जसे उत्पन्न मिळते त्याव्यतिरिक्त उत्पन्न मिळविण्यासाठी आपल्या बँकेने Exide Life Insurance ची कॉर्पोरेट एजन्सी घेतलेली आहे. त्यामधुन अहवाल सालात ₹ ३४.३१ लाख इतके उत्पन्न मिळालेले आहे.

२) बँकेने जनरल इन्शुरन्ससाठी ICICI Lombard ची कॉर्पोरेट एजन्सी घेतलेली असून अहवाल सालात याव्दारे ₹ ३०.९२ लाख इतके उत्पन्न मिळालेले आहे.

याशिवाय विज बिल भरणा, जीएसटी भरणा, पॅन कार्ड काढून देण्याची व गॅस सबसिडी खात्यामध्ये जमा करण्याची सुविधा दिलेली आहे. तसेच पंतप्रधान जिवन विमा योजना व पंतप्रधान अपघात विम्याचे हप्ते भरण्याची सुविधा मिळत आहे. खातेदारांनी या सर्व सेवा सुविधांचा लाभ घ्यावा व बँकेशी आपले नाते दृढ करावे ही विनंती.

**सभासद प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन**

आपली बँक सभासदांना, ग्राहकांना विविध आधुनिक सेवा देत आहे. त्यामध्ये ATM, RTGS, NEFT, Mobile Banking, SMS Banking अशा अनेक सेवा देत असताना ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल सेवांची पुर्णतः माहीती नसल्याने अनेक सभासद/ग्राहकांना नाहक आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून बँकेने आपल्या सभासदांना आजच्या डिजिटल तंत्रज्ञानाची माहीती व्हावी यासाठी संगणक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम दि. ३० डिसेंबर २०१८ रोजी आयोजीत केला होता.

**नफा वाटणी**

दि. ३१ मार्च २०१९ अखेर बँकेस ₹ १११११५६९०८.२३ इतका नफा झालेला आहे. मागील वर्षीचा शिल्लक नफा ₹ ९००८६.४२ जमेस धरता एकुण नफा ₹ १११२४६९९४.६५ नफा वाटणीस उपलब्ध आहे. सदर नफ्याची वाटणी खालील प्रमाणे करावी अशी मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण त्यास मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

**✼ नफा वाटणी ✼**

| अ.क्र. | तपशिल | रक्कम (₹) |
|---|---|---|
| १ | गंगाजळी (रिझर्व फंड) | ४,००,००,०००.०० |
| २ | लाभांष (द.सा.द.शे.१२%) | ३,६५,००,०००.०० |
| ३ | इमारत निधी | २,४०,००,०००.०० |
| ४ | शाखाविस्तार निधी | १०,००,०००.०० |
| ५ | गुंतवणुक अवमुल्यन निधी | ७५,००,०००.०० |
| ६ | लाभांष समिकरण निधी | १०,००,०००.०० |
| ७ | धर्मादाय निधी | २,००,०००.०० |
| ८ | आकस्मित निधी | २,००,०००.०० |
| ९ | सभासद शिक्षण निधी | ५,००,०००.०० |
| १० | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ११ | शिल्लक नफा | १,४६,९९४.६५ |
| | **एकूण** | **११,१२,४६,९९४.६५** |

### सेवकवर्ग

संस्थेची प्रगती व यश हे सेवकवर्गाची निष्ठा व कार्यक्षमता यांवर अवलंबून असते. अहवाल सालात सर्वच सेवकांनी ठेव वाढ व कर्ज वाटप, वसुली यासर्व क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे.

सध्याच्या बँकींग स्पर्धेच्या युगात अन्य बँकांबरोबर राहण्यासाठी सेवकांना भारतीय रिझर्व बँक, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असो, पुणे तसेच विठ्ठलराव विखे पाटील सहकार प्रशिक्षण केंद्र याठिकाणी प्रशिक्षणास पाठवून त्यांना बँकींगचे अद्यावत ज्ञान देण्याचा प्रयत्न केला जातो. अहवाल सालात २६५ सेवकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

### लाभांष

सभासदांना त्यांचे भागावर शे. १२% लाभांष वितरीत करण्याची मा. संचालक मंडळाची शिफारस आहे. आपण ती मान्य करावी ही विनंती.

### मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जे

मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक निकषानुसार कर्ज वाटप केलेले नाही.

### शाखाविस्तार

दिनांक ३१ मार्च २०१९ अखेर मुख्यालयासहीत ३७ शाखा, १ विस्तारित कक्ष कार्यरत आहे. नविन शाखांमुळे ठेवी, कर्जवाटप व सभासद संख्येत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे भागभांडवलातही मोठी वाढ होत आहे. बँकेने करमाळा येथे नुकतीच जागा खरेदी केली असुन लवकरच करमाळा शाखेचे स्थलांतर स्वमालकीच्या जागेमध्ये होईल.

### पुरस्कार

उत्तम कामगिरी करणाऱ्या सहकारी बँकांचा दरवर्षी विविध बँक असोसिएशन/फेडरेशन या विविध पुरस्कारांनी बँकांना सन्मानित करीत असतात. बँकेस मिळणारे पुरस्कार हे बँकेच्या नावलौकिकात भर घालतातच परंतु त्यापेक्षा सर्व संचालक मंडळ, अधिकारी वर्ग, सर्व सेवक वर्ग इत्यादींना नव चैतन्य व आनंद मिळवून देतात, परिणामी बँकेच्या सभासदांना, ग्राहकांना देत असलेली सेवा आणखी परिणामकारक होत असते.

### बँकेस सन २०१८ साठी मिळालेले पुरस्कार

१) दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन, मुंबई यांचेकडून पुणे विभागामधून ₹ १००० कोटीपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या बँकांमधून सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी 'कै. पद्मभूषण वसंतदादा पाटील उत्कृष्ठ नागरी सह.बँक' पुरस्कार.

२) दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स् फेडरेशन मुंबई यांचेकडून 'सर्वोत्कृष्ठ बँक पुरस्कार सन २०१८' (गट ₹ १००० कोटींच्या वर ठेवी ते ₹ ५००० कोटींपर्यंत)

३) पुणे जिल्हा नागरी सह. बँक्स् असो. पुणे एन.पी.ए. व्यवस्थापन बाबत पुरस्कार

### आभार

बँकेच्या दैनंदिन विकास व प्रगतीसाठी वेळोवेळी ज्या व्यक्तिंचे, संस्थांचे सहकार्य मिळाले त्यांचे ऋणनिर्देशन करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. त्यामध्ये आपले आदरणीय लोकनेते पद्मविभूषण मा. खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, मा. आ. श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), मा. खासदार सौ. सुप्रियाताई सुळे, मा.ना.श्री. राम राजे नाईक निंबाळकर सभापती, विधानपरिषद महाराष्ट्र राज्य, मा. श्री. विश्वासराव देवकाते, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे, मा. सौ. सुनेत्राताई पवार, अध्यक्षा, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, बारामती, मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील माजी सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य, मा. श्री. राजेंद्र पवार, अध्यक्ष, बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मा. श्री. रणजित पवार, अध्यक्ष, बारामती सहकारी औद्योगिक वसाहत, यांचे बँकेच्या प्रगतीसाठी सदैव मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. रमेशआप्पा थोरात व उपाध्यक्षा सौ.अर्चना घारे, इंदापुरचे आमदार मा. श्री. दत्तात्रय भरणे, मा. श्री. दशरथ माने माजी सभापती कृषी व पशु संवर्धन जिल्हा परिषद पुणे, मा. श्री. पुरूषोत्तम (दादा) जगताप अध्यक्ष सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, मा. श्री. प्रशांत काटे अध्यक्ष श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, मा.श्री. रंजनकुमार तावरे अध्यक्ष, दि माळेगांव सहकारी साखर कारखाना, मा. श्री. बाळासाहेब तावरे माजी अध्यक्ष

दि माळेगांव सहकारी साखर कारखाना तसेच बारामती नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. पौर्णिमा तावरे तसेच माजी अध्यक्ष सर्वश्री श्री सदाशिव (बापू) सातव, श्री जवाहरशेठ वाघोलीकर, श्री इम्तियाज शिकीलकर, मा. सौ. जयश्रीताई सातव तसेच अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. श्री. अरहतदास शहा इत्यादींनी बँकेस केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

तसेच सर्व शाखा क्षेत्रातील नगर परिषदांचे अध्यक्ष, पुणे, पिंपरी चिंचवड व सोलापूर महानगरपालिकांचे महापौर, उपमहापौर व बारामती तालुका दूध उत्पादक संघ, बारामती तालुका खरेदी विक्री संघ, बारामती तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद पुणे, श्री. काशिविश्वेश्वर विविध कार्यकारी सहकारी सोसायटी मर्या., बिल्डर्स असोसिएशन बारामती, बारामती स्विमर्स क्लब, व्यापारी महासंघ बारामती, बारामती मर्चंटस् असोसिएशन, तसेच बँकेच्या शाखांच्या कार्यक्षेत्रातील विविध सहकारी संस्था, पतसंस्था, सर्व संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांनी बँकेच्या विकासामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या बँकेस सहकार्य केलेले आहे. त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

